**फयान चक्रीवादळामुळे व अतिवृष्टीमुळे मच्छिमारांना झालेल्या नुकसानीपोटी त्यांना द्यावयाचे सानुग्रह अनुदान .**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-२००९/प्र.क्र.१३५/पदुम-१४**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२.**
**दिनांकः-२६ नोव्हेंबर,२००९.**

**वाचा**:-शासन आदेश क्रमांकःमत्स्यवि-२००९/प्र.क्र१३५/पदुम-१४,दिनांक २५.११.२००९.

**प्रस्तावना**:-

राज्यात दिनांक १० व ११ नोव्हेंबर,२००९ रोजी फयान चक्रीवादळ व अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीमुळे मुंबई शहर,मुंबई उपनगरे,ठाणे,रायगड,रत्नागिरी व सिंधुदुर्ग या सागरी जिल्हयातील मच्छिमारांच्या नुकसान झालेल्या मोठया जाळयांना प्रति जाळी रु.२५,०००/- इतके सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय उपरोक्त दि.२५.११.२००९ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. सदर सानुग्रह अनुदानाच्या मर्यादेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णयः-**

राज्यातील सागरी जिल्हयामधील समुद्रामध्ये मासेमारी करण्याकरिता गेलेल्या मच्छिमारांच्या मासेमारी साधनांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्यामुळे नुकसानग्रस्त मच्छिमारांना एक विशेष बाब म्हणून रु.२५,०००/- इतके सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. त्याऐवजी नुकसानग्रस्त प्रति रापण जाळयांना रु.५०,०००/- इतके सानुग्रह अनुदान मंजूर करण्याचा निर्णय दि.२५.११.२००९ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सानुग्रह अनुदान वाटन करण्यास शासन मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. यासाठी दिनांक २५.११.२००९ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील अर्थसहाय्य मंजूरीसंदर्भातील निश्चित केलेले निकष हे कायम राहतील. मंजूर केलेले वाढीव सानुग्रह अनुदानासाठी खर्च यापुर्वी वितरीत केलेल्या रकमेतून करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज.ल.पावरा),

अवर सचिव,महाराष्ट्र शासन,

प्रति,

आयुक्त,मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई-५१.(५ प्रती)
प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय,कोकण भवन,बांद्रा (पूर्व),मुंबई
सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,मुंबई/ठाणे/अलिबाग/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
महालेखापाल,महाराष्ट्र-१/२(लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे/रायगड (अलिबाग)/रत्नागिरी/मालवण (सिंधुदुर्ग)
सहाय्यक कोषागार अधिकारी,पालघर(ठाणे)/अलिबाग(रायगड)/मालवण(सिंधुदुर्ग)
वित्त विभाग,(व्यय-१/अर्थसंकल्प-१५/अर्थसंकल्प-३),मंत्रालय,मुंबई-३२.

प्रत,

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
मा.मंत्री (वित्त व नियोजन)यांचे खाजगी सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
मां.मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य,मुंबई
मा.राज्यमंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे खाजगी सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
मा.अतिरिक्त मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन),मंत्रालय,मुंबई